स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड.

मानव्य विद्याशाखा अंतर्गत समाजशास्त्र विषयातील विद्यावाचस्पती (पीएच. डी.) पदवीसाठी सादर करावयाचा संशोधन आराखडा

संशोधनाचा विषय

“संत गाडगेमहाराज व्यक्ती, विचार आणि समाजकार्य : एक चिकित्सक अभ्यास”

संशोधक

पाटील शितल अविनाश

एम.ए., डी.एड्.

मार्गदर्शक

प्रो.डॉ. बी. डी. करे

एम. ए., सेट, पीएच.डी.

समाजशास्त्र, विभाग प्रमुख

नेताजी सुभाषचंद्र बोस कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, नांदेड.

डिसेंबर - २०२४

१. प्रस्तावना:

भारतीय समाजात संत गाडगे महाराज यांच्या विचार व आचाराला अनन्यसाधारण असे महत्त्व आहे. मनुष्य हा समाजाचा पाया असतो व तो कसा असावा हे आपणाला संत गाडगे महाराज यांच्या चरित्रावरून लक्षात येते. त्यांचा जन्म २३ फेब्रुवारी १८७६ रोजी डोणगाव ता. दर्यापूर जि. अमरावती येथे झाला. संतांचा जन्म म्हणजे अखंड मानवजातीच्या विकासाची सुरुवात म्हणायला हरकत नाही. आजपासून ७० ते ८० वर्षापूर्वी ज्यांनी समाज शिक्षक बनून, समाजाला अंधश्रद्धा, भोळेपणा, दांभिकता या सर्व दुर्गुणांपासून मुक्त करण्याचे कार्य केले, असे संत गाडगे महाराज म्हणजे, त्या काळातील चालती बोलती पाठशाळा किंवा गतीशील सामाजिक विद्यापीठ म्हणायला हरकत नाही.

संत गाडगे महाराज यांनी सबंध आयुष्यभर समता, बंधुत्व, स्वातंत्र्य, मानवता ही शिकवण दिली. त्यांनी आपल्या कीर्तनाच्या माध्यमातून समाजाला जागृत केले व समाजातील अनिष्ठप्रथा, परंपरा अस्पृश्यता मिटवण्याचा प्रयत्न केला. समाजातील प्रत्येक घटकासाठी त्यांनी आपल्या कीर्तनातून जागृती निर्माण करण्याचा प्रयत्न केला.

संत गाडगे महाराज यांनी विषमता नष्ट करून समाजात समता व राष्ट्रीय एकात्मतेची भावना जागृत करण्याकरीता आपले सबंध आयुष्य पणाला लावले. समाज प्रबोधना बरोबरच त्यांनी प्रत्यक्ष कृतीतून बदल घडवण्याचा प्रयत्न केला. त्यांनी दंभ, अहंकार, स्वार्थ, संकुचित वृत्ती इत्यादींनी भ्रष्ट झालेल्या धर्मावर कोरडे

ओढले व अस्पृश्यते विरूध्द अनेक कीर्तनाद्वारे आणि कृतीद्वारे लोकजागृती केली. त्यांनी ग्रामीण समाजातील अज्ञान, अधंकार, अंधश्रद्धा दूर करण्याचा प्रयत्न करून मानवी मूल्य जोपासण्याची अनोखी शिकवण आपल्या समाज प्रबोधनांमधून दिली. मानवी जीवनात असणारी मूल्ये नैतिकता याला अनन्यसाधारण महत्त्व आहे. मूल्यांची जपणूक, मूल्यांचे संवर्धन ही मानवी जीवनाची गरज आहे. ही गरजच संशोधनास प्रेरक ठरणारी आहे. प्रस्तुत विषय संशोधन प्रक्रियेचे स्वरूप स्पष्ट करण्यासाठी संशोधन आराखडा महत्त्वाचा ठरतो.

२. संशोधन विषयाची व्याप्ती:

प्रस्तुत विषयाची व्याप्ती स्पष्ट करत असताना संत गाडगे महाराज यांच्या सामाजिक कार्याचे अवलोकन होणे महत्त्वाचे आहे. आजच्या काळाचा विचार केला असता, स्वतःला सुशिक्षित व आधुनिक म्हणून घेणारे आम्ही, आजही देव-देवतांच्या नावावर प्राण्यांचा, पशुंचा बळी देतो. पारंपरिक रुष्ट बाबींना खतपाणी घालून अंधश्रद्धेच्या भोवऱ्यात अडकून पडतो. कुठलीच शाळा न शिकलेले, अशिक्षित, संत गाडगे महाराज मात्र, विज्ञानाची कास धरून त्यांच्या किर्तन रुपी तलवारीने, अंधश्रद्धेवर सपासप वार करतात ही बाब आपणाला जीवनातून अंधश्रद्धा दूर करायला सांगते.

संत गाडगे महाराज यांनी समाज सेवेसाठी जीवन समर्पित केले. त्यांनी प्रत्येकात देशप्रेमाची भावना जागृत केली, कामगार, शेतकरी, शेतमजूर, कष्टकरी वर्ग यांचा स्वातंत्र्य लढ्यात सहभाग वाढवला. समाजात सामाजिक समता निर्माण

करण्याचा प्रयत्न केला. समाजातील आर्थिक विषमता, अंधश्रध्दा, वाईट चाली-रीती नष्ट करण्याचा त्यांनी प्रयत्न केला. आजच्या पिढीनेही त्यांच्या कार्याची दखल घ्यावी म्हणून मी जाणीवपूर्वक "संत गाडगे महाराज - व्यक्ती, विचार आणि समाजकार्य : एक चिकित्सक अभ्यास" हा विषय संशोधनासाठी निवडलेला आहे.

३. संशोधनाची उद्दिष्टे:

१) संत गाडगे महाराज यांचा मानवमुक्तीचा विचार व त्यातील सहभाग शोधने.

२) संत गाडगेमहाराज यांच्या जीवन चरित्राचा अभ्यास करणे.

३) संत गाडगेमहाराज यांच्या जीवनविषयक तत्त्वज्ञानाची पूर्वपीठिका अभ्यासणे.

४) संत गाडगेमहाराजांच्या विचारातील समाज प्रबोधनपर विचारांचा शोध घेणे.

५) संत गाडगेमहाराज यांच्या समाज प्रबोधनपर विचारांचे वर्गीकरण करणे.

६) संत गाडगे महाराज यांचे जीवनविषयक तत्त्वज्ञान व समाज प्रबोधनपर विचार याचा सहसंबंध अभ्यासणे.

७) संत गाडगे महाराजांच्या कार्याची तत्कालीन उपयुक्तता प्रासंगिकता अभ्यासणे.

४. गृहीतके:

१. संत गाडगे महाराजांनी समाजात समता प्रस्थापित करण्याचा प्रयत्न केला.

२. समाजातील अनिष्ठप्रथा, परंपरा अस्पृश्यता मिटवण्याचा प्रयत्न केला.

३. मानव मुक्तीचा ऐतिहासिक लढा उभा केला.

४. समाज सुधारणेतील योगदान व समाजात जागृती निर्माण करण्यासाठी प्रयत्न केले.

५. कीर्तन हे समाज प्रबोधनाचे व समाज सुधारण्याचे साधन.

५. संशोधन पध्दत:

प्रस्तुत संशोधनासाठी जीवनचरित्र पध्दती, प्राथमिक व दुय्यम स्रोत पध्दती, ग्रंथालय पध्दती, गुणात्मक पध्दती, क्षेत्रभेट पध्दती, सर्वेक्षण पध्दतीचा अवलंब केला जाईल.

६. सैधांतिक विश्लेषण:

उपरोक्त विषयाच्या सैधांतिक दृष्टिकोनातून विश्लेषण करत असताना किंवा तथ्यांचे विश्लेषण करत असताना खालील प्रमाणे काही सैद्धांतिक दृष्टिकोनाचा आधार संशोधकाद्वारे घेतला जाईल ज्यामध्ये उदारमतवादी विचार प्रणाली, एकीकरण वादी सिद्धांत, सुधारमतवादी विचार प्रणाली, सामाजिक परिवर्तनाचा सिद्धांत व समाज व्यवस्थेचा सिद्धांत या सिद्धांताचा आधार घेऊन प्रस्तुत संशोधनामध्ये तथ्यांचे विश्लेषण करून विषयाची साधर्म्य किंवा वैधर्म्य विश्लेषित करता येईल.

७. तथ्य वर्गीकरण - माहितीचे विश्लेषण:

प्रस्तुत संशोधनामध्ये विश्लेषण व निर्वचन करण्यासाठी एस पी एस एस या तंत्राचा अवलंब करून तथ्यांचे विश्लेषण व निर्वचन आलेख, आकृत्या, पायचार्ट, स्तंभालेख वारंवारिता व टक्केवारी यासारख्या संख्यात्मक घटकांचा आधार घेऊन तथ्यांची मांडणी करण्यात येईल. तसेच उपरोक्त संशोधनात तथ्य संकलन व त्याचे वर्गीकरण करत असताना प्राथमिक तंत्रामध्ये मुलाखत अनुसूची व निरीक्षणाचा अवलंब करण्याबरोबरच द्वितीय तथ्यांचा सुद्धा अवलंब करण्यात येईल ज्यामध्ये मासिके, पाक्षीके, संदर्भ ग्रंथ, क्रमिक पुस्तके, शासकीय अहवाल, स्मरणिका, विशेषांक, वर्तमानपत्रे किंवा संत गाडगे महाराज यांच्या कार्यावर आधारलेली संपादकीय पुस्तके यांचाही अवलंब करण्यात येईल.

८. गुणात्मक माहितीचे विश्लेषण:

उपरोक्त विषयाच्या गुणात्मक माहितीचे विश्लेषण व निर्वचन करत असताना संख्यात्मक तथ्याबरोबर गुणात्मक तथ्याच्या मांडणीसाठी सुद्धा उपयोगात आणली जाईल.

९. संशोधन विषयक कालखंड:

इ.स. १८९९ ते इ.स. १९५६ या समकालीन काळातील संत गाडगे महाराज यांच्या विचाराची प्रासंगिकता लक्षात घेऊन त्या विचाराचा आजच्या समाज व्यवस्थेवर पडलेल्या प्रभावाचे अध्ययन करणे.

१०. प्रकरण रचना:

संत गाडगे महाराज यांनी केलेल्या कार्याचा व त्यांच्या विचारधारेचा प्रभाव, समाज प्रबोधनातील त्यांचे योगदान, समाजातील वर्ण-जातीय शोषणाविरोधात त्यांनी दिलेला लढा व त्यांच्या सामाजिक कार्याचा आढावा तसेच त्यांनी अंधश्रद्धा निर्मूलनासाठी दिलेले योगदान याचा परिपूर्ण अभ्यास करण्यात येईल. प्रस्तुत प्रबंधाच्या अभ्यासाची प्रकरण निहाय रचना पुढीलप्रमाणे करण्यात येत आहे.

प्रकरण पहिले : प्रस्तावना

प्रस्तुत प्रकरणांमध्ये संत गाडगे महाराज यांच्या मानवमुक्ती संघर्षाचा ऐतिहासिक आढावा व संशोधन विषयाच्या अनुषंगाने अभ्यास करीत असताना शोध विषयाची प्रारंभिक मांडणी करण्यात येईल.

प्रकरण दुसरे : संत गाडगे महाराज यांचे जीवन चरित्र

प्रस्तुत प्रकरणांमध्ये संत गाडगे महाराज यांच्या जीवनचरित्राचा आढावा घेण्यात येईल. संत गाडगेमहाराज यांच्या जीवनातील घटनांचा कालानुक्रमे अभ्यास करण्यात येईल तसेच या अनुषंगाने संत गाडगेमहाराज यांच्या कार्याचा आढावा घेण्यात येईल.

प्रकरण तिसरे : संत गाडगे महाराज यांचे जीवन विषयक तत्त्वज्ञान व त्या तत्त्वज्ञानाचा सामजिक प्रभाव

प्रस्तुत प्रकरणांमध्ये संत गाडगे महाराज यांचे जीवनविषयक तत्त्वज्ञान अभ्यासण्यापूर्वी त्यांच्या जीवन विषयक विचारांची पूर्वपीठिका अभ्यासल्या जाईल. कारण पूर्वपीठिकेचा अभ्यास केल्याशिवाय जीवनविषयक तत्त्वज्ञान समजून घेणे सयुक्तिक नाही. पूर्वपीठिकेच्या पायावरच जीवनविषयक तत्त्वज्ञानाची उभारणी झालेली आहे त्यामुळे सदरील प्रकरणांमध्ये याचा सविस्तर मागोवा घेण्यात येईल.

प्रकरण चौथे : संत गाडगे महाराज यांचे सामाजिक विचार आणि सामजिक परिवर्तन

प्रस्तुत प्रकरणांमध्ये संत गाडगे महाराज यांच्या सामाजिक विचाराचा आढावा घेण्यात येईल. संत गाडगेमहाराज यांच्या सामाजिक विचारांचा संशोधनात्मक अभ्यास यापुर्वी झालेला नसल्यामुळे त्यांच्या विचारांचा अभ्यास करणे आवश्यक आहे.

प्रकरण पाचवे : संत गाडगे महाराज यांच्या जीवन विषय तत्त्वज्ञान व सामाजिक विचार यांची सद्यस्थितीत असलेली उपयुक्तता

प्रस्तुत प्रकरणांमध्ये संत गाडगे महाराज यांच्या जीवनविषयक तत्त्वज्ञाना सोबतच आज घडीला त्यांच्या विचाराची व तत्त्वज्ञानाची खऱ्या अर्थाने काय उपयुक्तता असेल याचा बारकाईने अभ्यास करण्यात येईल.

प्रकरण सहावे : समरोप व निष्कर्ष

प्रस्तुत प्रकरणांमध्ये संत गाडगे महाराज - व्यक्ती, विचार आणि समाजकार्य : एक चिकित्सक अभ्यास या विषयावर सखोल संशोधन करून त्यावर आधारित निष्कर्ष काढण्यात येतील व जे निष्कर्ष निघतील त्या निष्कर्षाचा परामर्श या प्रकरणात करण्यात येईल व त्या बरोबरच काही महत्वाच्या शिफारशी नोंदवण्यात येतील.

११. परिशिष्टे:

i. मुलाखत अनुसूची

ii. व्यष्टी अध्ययन पद्धतीची तपासणी सूची

iii. छायाचित्रे

१२. संदर्भ ग्रंथ सूची

०१. अत्रे, प्र.के., (२००३), 'मराठी माणसे, मराठी माने', परचुरे प्रकाशन, मुबई.

०२. आगलावे, प्रदीप, (२०००), ' सामाजिक संशोधक पध्दतीशास्त्र व तंत्रे', श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर.

०३. कवडे, पांडुरंग, (२०००), 'कर्मयोगी संत गाडगेबाबा', गाडगे महाराज प्रकाश समिती, मुंबई .

०४. कवडे, रघुनाथ (२००२), 'वैराग्यमूर्ती गाडगेबाबांची भाषणे', अमोल प्रकाशन, नागपूर.

०५. काठोळे, नरेशचंद्र, (२००४), 'गाडगेबाबा', विदर्भ सत्यशोधक मंडळ, अमरावती.

०६. कामत, प्रभाकर, (२००४), 'कबीर', नॅशनल बुक ट्रस्ट इंडिया, नवी दिल्ली.

०७. पांडे, दया, (२०१०), 'संत गाडगेबाबांचे सामाजिक विचार', श्री. साईनाथ प्रकाशन, नागपूर.

०८. केचे, मधुकर, (१९९०), 'श्री संत गाडगे महाराज', साकेत प्रकाशन, औरंगाबाद.

०९. कुंडले, म.बा., (२००३), 'शैक्षणिक तत्त्वज्ञान व शैक्षणिक समाजशास्त्र', श्री विद्या प्रकाशन, पुणे.

१०. गिते, गंगाधर, (२००८), 'नामदेवे रचिला पाया तुका झालासि कळस', मूलनिवासी पब्लिकेशन ट्रस्ट, नवी दिल्ली.

संशोधक

पाटील शितल अविनाश

एम.ए., डी.एड्.

संशोधन मार्गदर्शक

प्रो.डॉ. बी. डी. करे

एम. ए., सेट, पीएच.डी.

समाजशास्त्र, विभाग प्रमुख

नेताजी सुभाषचंद्र बोस

कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, नांदेड.